भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/१२/२०१६

**१) घराच्या आवारातील गोठयातुन गायीची चोरी . :—**

दिनांक ०६/१२/२०१६ रोजी २४.०० वा. दर. यातील फिर्यादी गिरीधारी परवतकर वय ५५ वर्ष, रा. हमेशा यांच्या घरी गोठयामध्ये बांधलेली १ पांढऱ्या रंगाची गाय कि. ३५,०००/—रु. ची यातील आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेऊन विक्री केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :—**

दिनांक १३/१२/२०१६ रोजी १८.०० वा. दर. यातील जखमी राजन नामदेव मासुरकर वय ४३ वर्ष रा. गौतम नगर पवनी हा तहसिल कार्यालयाकडे पायी फिरायला गेला होता घरी परत येत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने अपघात रजीस्टर क्र. २४ चौकशी जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन तरुणाचा मृत्यु. :—**

दिंनाक. २०/१२/२०१६ रोजी ०८.०० ते ११.०० वा. दर. यातील मृतक रवी तुलाराम बांते वय १८ वर्ष, रा. मचारना हा ईयत्ता १२ वी मध्ये शिकत होता तो नेहमी प्रमाणे सकाळी ०७.०० वा. आपल्या शेतावर तुळी राखण्यासाठी जात असे. मृतक हा आपल्या शेतात तुळी राखण्यासाठी सकाळी ०७.०० वा गेला होता परंतु घरी परत न आल्याने त्याचा शेताकडे शोध असता मृतकचे प्रेत स्वतःचे शेतातील मोहाचे झाडाला नॉयलान दोरीच्या साहायान गळफास घेवुन आत्महत्या केल्याचे दिसुन आल्याने फिर्यादी ताराचंद भिमराव बांते वय ३० वर्ष, रा. मचारना यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो. स्टे. पालांदुर हे करीत आहे.

**४) विष प्राशन करुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—**

दिंनाक. २०/१२/२०१६ रोजी १०.०५ वा. दर. यातील मृतक प्रवीन अनील गणविर वय ३८ वर्ष, रा. तकीया वार्ड भंडारा दि. १०/१२/२०१६ ला विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सारु भंडारा येथे आ.सी.यु. मध्ये भरती केले असता दि. २०/१२/२०१६ चे १०.०५ वा उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

**५) गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :—**

दिंनाक. २०/१२/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील मृतक देवराम भोजीराम गोमासे वय ४६ वर्ष, रा. इंदीरा वार्ड भंडारा हा आजाराने त्रासाला होता तो दि. २०/१२/२०१६ चे १६.०० वा. मृतकने घरी कोणीही हजर नसतांना स्लॅपचे हुकाला ईलेक्ट्रीक वायरने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी दिनेश नामदेव निपाने वय ३६ वर्ष, रा. इंदीरा वार्ड भंडारा याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :—

दिनांक २०/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. आंधळगाव व लाखनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २४ लिटर हातभट्टी दारू+ साहित्य कि. १,६४०/—रू. व ७ लिटर २० मिली देशी दारूकि. ९७५/—रू. असा एकुण कि. २,६१५/—रू. जप्त करण्यात आला दृ

७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक २०/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहनाकरीता ०२ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ११ केसेस व ईतर वाहनांवरती ४८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.